# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **भूगोल विभाग – राज्यस्तरीय चर्चासत्र**





रवींद्र जायभाय : 'पर्यावरणपूरक पर्यटन-शाश्वत विकास' विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र

# जैवविविधता जपणे गरजेचे

राजगुरुनगर : पर्यावरणपूरक पर्यटन या संकल्पनेचा विचार प्राधान्याने करण्याची गरज आहे. सह्याद्रीच्या पश्चिम घाटामधील नैसर्गिक साधनसंपत्ती व जैवविविधतेचा समृद्ध वारसा जतन करणे सर्वांचे कर्तव्य आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील भूगोल विभागातील प्रा. डॉ. रवींद्र जायभाय यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात भूगोल विभाग आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पर्यावरणपूरक पर्यटन - शाश्वत विकास' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, डॉ. वीरेंद्र नगराळे, डॉ. जोतीराम मोरे, जयपूर विद्यापीठातील डॉ. श्वेता खंडेलवाल, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. विजय भगत, डॉ. अर्जुन मुसमाडे, डॉ. सचिन देवरे, डॉ. तानाजी गिते आणि विविध महाविद्यालयातून आलेले प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात आढळणाऱ्या दुर्मिळ औषधी वनस्पती, वन उत्पादने यांचे संकलन व त्यावर प्रक्रिया करून, त्याच्या विक्रीतून स्थानिक आदिवासींना रोजगार मिळवून देण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची गरज जायभाय यांनी व्यक्त केली. जंगलाचे संवर्धन करताना वणवे रोखणे, कुऱ्हाडबंदी, शिकारबंदी, चराईबंदी करताना समाजजागृती करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

### शाश्वत विकास व्हावा

- खेड तालुका भौगोलिक, ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, पर्यटकांना आकर्षित करताना त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. तसेच, पर्यटन व रोजगार यांची सांगड घालून खेड तालुक्याचा शाश्वत विकास होणे आवश्यक असल्याचे बुट्टे पाटील यांनी सांगितले.
- भूगोल विभागप्रमुख व चर्चासत्राचे समन्वयक प्रा. दिलीप मुळूक यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा डी. एम. मारकड यांनी आभार मानले.

राजगुरु महाविद्यालयात चर्चासत्राच्या निमित्ताने संशोधन शोधपत्रिकेचे प्रकाशन करताना देवेंद्र बुट्टे पाटील, प्रा. डॉ. रवींद्र जायभाय.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख